**MHLA**090032052025

## निशाणी क्र.१ खालील आदेश

अर्जदार त्याच्या मालकीची कालवड, गाय व बैल हे अपराध क्र.३४६/२०२५ मध्ये जप्त करण्यात आले आहेत. आरोपी यांच्या विद्वान विकीलांच्या म्हणण्याप्रमाणे अपराधाची चौकशी होऊण निकाल लागण्यास बराच कालावधी लागू शकतो. जप्त असणारे पशुधन यांचे अन्नपाणी व देखभाली शिवाय नुकसान संभवते. त्यामुळे सुपूर्तनामावर ते मिळणेकामी त्यांनी अर्ज केलेला आहे.

२. तपास अधिकारी यांनी आपले म्हणणे नि.क्र.६ वर दाखल करून सदरील पप्त पशुधन सोडून देण्यास त्यांनी हरकत दर्शवली आहे. तसेच, सरकरी वकील यांनी आपले म्हणणे नि.क्र.७ वर दाखल करून त्यांनी देखीलपप्त पशुधन सोडून देण्यास हरकत दर्शवली आहे. गोशाळा यांना पत्र पाठवून देखील त्यांनी त्यांचे म्हणणे अद्याप पावेतो दाखल केलेले नाही.

३. पशुधनांचे निश्चीत देखभाली अभावी नुकसान संभवते. त्यामुळे पुढील प्रमाणे अर्जदार यांना अटी व शर्तीवर सदरील जनावरांचा ताबा देण्यात येतो.

**अट–१.** अर्जदार यांनी सदरील जनावरे संबंधीत पोलीस स्टेशन व न्यायालय येथे चौकशीच्या कामी हजर ठेवण्यासाठी रक्कम रु.२,५०,०००/– चा बॉन्ड अदा करावा.

**अट–२.** अर्जदार यांनी पुढील आदेश होईपर्यंत सदरील जनावरे इतर कोणालाही हस्तांतरीत करू नये.

अर्जदार हे वरील प्रमाणे अटींचे पालन करणार असल्यास त्यांना जनावरांचा ताबा देण्यात यावा. त्याप्रमाणे यादी संबंधीत पोलीस ठाणेला अदा करण्यात यावी.

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.04.11 15:41:52 +0530

**उदगीर.** **(श्री. व्ही. आर. घराळ)**

**दि.११/०४/२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उदगीर.**